## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. १४ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या हिवाळी -२०२५ च्या विज्ञान वर्गाच्या प्रात्यक्षिक परीक्षांना सुरुवात झाली असून कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी व प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांनी आज दि. १४ ऑक्टोबर रोजी काही महाविद्यालयांना आकस्मिक भेटी दिल्या व जेथे अनियमितता दिसून आली तेथे महाविद्यालयांना सुधारणा करण्याची ताकीद दिली.

विद्यापीठाने संलग्नित महाविद्यालयांमध्ये निकोप शैक्षणिक वातावरण, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि कॉपीमुक्त परीक्षा हे दृढसंकल्प घेतले आहेत. त्या अनुषंगाने विद्यापीठाने गेल्या तीन वर्षापासून प्रयत्न सुरु केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आज विद्यापीठाचे कुलगुरू व प्र-कुलगुरू यांनी सध्या महाविद्यालयांमध्ये सुरु असलेल्या विविध विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षांच्या वेळी अचानकपणे एकाचवेळी वेगवेगळया महाविद्यालयात स्वतंत्रपणे भेटी दिल्या. या महाविद्यालयांच्या भेटी दरम्यान जेथे जेथे अनियमितता दिसून आली त्या त्या ठिकाणी संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, परीक्षक, अध्यापक यांना विद्यापीठाच्या परीक्षा आयोजनाबद्दलच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून परीक्षा घेणेबाबत सक्त ताकीद दिली व तातडीने सुधारणा करण्याबाबत सूचना दिल्या. तसेच दि. १३ ऑक्टोबर रोजी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांनी देखील अशाच भेटी देवून महाविद्यालयांना सूचना दिल्या आहेत. कुलगुरू व प्र-कुलगुरू यांच्याकडून अशा अचानक भेटी व परीक्षा आयोजनाबाबतच्या तपासण्या नियमित सुरु असणार आहेत. त्यामुळे महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या परीक्षा नियमावलीचे काटेकोरपणे पालन करणे व निकोप वातावरणात परीक्षा घेणे आवश्यक आहे. अशी माहिती विद्यापीठ सूत्रांकडून देण्यात आली आहे.

### बातमी नं. २

जळगाव (प्रतिनिधी) दि. १४ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग व रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट यांच्यातर्फे आयोजित युवारंग युवक महोत्सवात विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातील इंग्रजी विभागातील विद्यार्थिनी प्रांजली जोशी हिने वादविवाद स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळवून कांस्य पदक प्राप्त केले. तिच्या या यशाबद्दल भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा.म.सु.पगारे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून तिचा सत्कार करण्यात आला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग व रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट यांच्यातर्फे युवारंग महोत्सवाचे ८ ऑक्टोंबर ते १२ ऑक्टोंबर दरम्यान आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते या युवारंग महोत्सवात इतर कला प्रकारांमध्ये रंगमंचीय, संगीत व वाङ्मयीन यांमध्ये विद्यापीठातील इतर प्रशाळेतील सुवर्ण व रौप्य पदक प्राप्त झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये वैभव भोंबे या दिव्यांग विद्यार्थ्याला वकृत्व स्पर्धेत तृतीय पारितोषिक मिळाले. तसेच कृपा पाटील हिला एकांकिका स्पर्धेत पारितोषिक मिळाले. अनुराग जगदाळे हयाने सुगम, नाट्य, व लोकसंगीत या कलाप्रकारात सुर्वणपदक प्राप्त केले. तर तेजपाल देशमुख याने एकांकिका आणि भारतीय लोकनृत्य स्पर्धेत पारितोषिक मिळवले आहे या उत्तम कामगिरीमुळे संघाचे समन्वयक डॉ. सुचित्रा लोंढे, तेजस मराठे, डॉ. सागर चक्रनारायण, डॉ. चिंतामण आगे, यांचाही याप्रसंगी भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ.म. सु. पगारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### बातमी क्रमांक ३

जळगाव (प्रतिनिधी) दि. १४ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिक शास्त्रे प्रशाळेतील डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाच्या वतीने दि. १३ रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त "भारतीय संविधान आणि महिला" या विषयावर सामाजिक कार्यकर्त्या श्रद्धा रेखा राजेंद्र यांचे व्याख्यान झाले.

यावेळी बोलताना श्रद्धा रेखा राजेंद्र म्हणाल्या की,भारतीय संविधानातील स्त्री पुरुष समानता विषय तरतुदींचे विश्लेषण करून संविधानातील स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य समाजात रुजविण्याची गरज असल्याचे सांगत संविधातील स्त्री पुरुष समानतेचे महत्व अधोरेखित केले. या वेळी कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाचे प्रमुख प्रा. राकेश रामटेके

तर कार्यक्रमाचे अध्यक्ष सामाजिक शास्त्रे प्रशाळेचे संचालक प्रा. अजय पाटील तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. निखिल रंजनकर, पुणे यांची उपस्थिती होती.

दुसऱ्या सत्रात प्रा. निखिल रंजनकर यांचे "मूलभूत कर्तव्य आणि सामाजिक माध्यम व मोबाईल व्यसनाधिनता", या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. यावेळी डॉ. सागर चक्रनारायण, डॉ. मनोज इंगोले, डॉ. कविता पाटील, डॉ. दिगंबर सावंत श्री. विजय कोळी डॉ. विजय घोरपडे उपस्थिती होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजय घोरपडे यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थीनी अनिता ओव्हाळ तर गौरव खराटे याने आभार व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमांस विद्यापीठातील विविध प्रशाळेतील विद्यार्थी, शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**बातमी क्रमांक ४**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे प्रशाळा, समाजकार्य विभागाअंतर्गत दि. १० ऑक्टोबर रोजी रोजी जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त मानसिक आरोग्य याविषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उदघाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सनराईज ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे प्रभारी प्राचार्य चेतन दिवाण यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्रा. चेतन दिवाण यांनी मानसिक आरोग्य याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, मानसिक आरोग्य संदर्भात आपण योग्य ती काळजी घेतली पाहिजे आपल्या सभोवताली असणाऱ्या नागरिकांना देखील यासंदर्भात जागरूक केले पाहिजे. समाजकार्याचे विद्यार्थी म्हणून मानसिक आरोग्य याविषयी आपली जबाबदारी मोठी असून आपण समाजात याविषयी जागररूकत निर्माण करावी असे आवाहन त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमाला समाज कार्य विभागाचे संचालक, प्रा. डॉ. अजय पाटील, प्रा. वर्षा पालखे, डॉ. कविता पाटील, डॉ. सुषमा तीनगोटे, प्रा. दिगंबर सावंत, विरेश पाटील, प्रा. विनेश पावरा, प्रा. योगेश माळी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. योगेश माळी यांनी तर आभार प्रा. वर्षा पालखे यांनी मानले

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १४ ऑक्टोबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता